# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. सर्वसाधारण सभा दिनांक १३ /०२/२०१९**

**सभा सुचना क्रं. १० सायं ४.३० वा.**

| | विषयाचे नाव | मा. सर्वसाधारण सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १. | मागील मा. सर्वसाधारण सभा दि. १७/०१/२०१९ रोजीचे इतिवृत्त कायम करणे. | ठराव :- मागील मा. सर्वसाधारण सभा दि. १७/०१/२०१८ रोजीचे इतिवृत्त कायम करणेंत येत आहे.<br>**अनुमोदक :- ( चंद्रकांत गोरीवले) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| २. | प्रश्नोत्तरे | निरंक |
| ३. | शासकीय पत्रव्यवहार माहितीस्तव. | निरंक |
| ४. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती - आय वसई आस्थापनेवरील कर्मचारी श्री. रवि खोडा परमार, वाहनचालक यांना स्वेच्छा निवृत्ती देणेबाबत. | ठराव/निर्णय :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती - आय, वसई येथील कर्मचारी श्री. रवि खोडा परमार, वाहन चालक यांनी महानगरपालिका सेवेतून स्वेच्छानिवृत्ती मिळणेबाबत विनंती केली असून श्री. रवि खोडा परमार यांची २० वर्षाची अर्हताकारी सेवा पुर्ण झाली असल्याने त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम ६६(१) नुसार त्यांची स्वेच्छानिवृत्तीची नोटीस स्विकारुन नोटीसीस तीन महिने पुर्ण झालेनंतर दिनांक २१/०२/२०१९ रोजी मध्यान्होत्तर त्यांना महानगरपालिका सेवेतुन स्वेच्छासेवानिवृत्त करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच श्री.रवि परमार यांना स्वेच्छासेवानिवृत्ती नंतरचे देय असलेले अनुषंगिक लाभ अदा करणेस आजची सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेत येत आहे.<br>**अनुमोदक :- (प्राची कोलासो ) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ५. | कु.सोनू दयानंद सरबटा, यांस वारस तत्वावर महानगरपालिका सेवेत समाविष्ठ करुन घेणबाबत. | निर्णय/ठरावः- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती - ई, नालासोपारा (प.) आस्थापनेवरील कर्मचारी श्री. दयानंद दिवाण सरबटा, सफाई कामगार हे दिनांक २०/१०/२०१८ रोजीमहानगरपालिका सेवेतून रुग्णता सेवानिवृत्त झाले असुन त्यांचा मुलगा श्री. सोनु दयानंद सरबटा हे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचेकडील शासन परिपत्रक दिनांक २१ ऑक्टोबर, २०११, शासन परिपत्रक दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ व शासन निर्णय दिनांक ११ मार्च, २०१६ मधील तरतुदीनुसार वारसहक्क नियुक्तीसाठी |

| | | |
|---|---|---|
| | | पात्र असल्याने त्यांना लाड समितीच्या शिफारसीनुसार वारस हक्काने महानगरपालिका सेवेत "सफाई कामगार" या पदावर सामावुन घेणेस ही महासभा मान्यता देत आहे<br>**अनुमोदक :- (किशोर ग. पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ६. | **कै. बाळा रामकिसन केवट, सफाईकामगार, यांचे जागी त्यांची वारस पत्नी श्रीमती मनिषा बाळा केवट, यांना वारसा हक्काने सफाई कामगार या पदावर नियुक्ती करणेबाबत.** | ठराव/निर्णय :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती - सी, चंदनसार विरार विभाग येथील कर्मचारी कै. बाळा रामकिसन केवट, सफाई कामगार हे दिनांक १८/०५/२०१३ निधन झालेले असुन त्यांची पत्नी श्रीमती मनिषा बाळा केवट (वय ३२ वर्षे, ६ महिने) यांना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचेकडील शासन परिपत्रक दिनांक २१ ऑक्टोबर, २०११, शासन परिपत्रक दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ व शासन निर्णय दिनांक ११ मार्च, २०१६ मधील तरतुदीनुसार वारसाहक्क नियुक्तीसाठी पात्र असल्याने श्रीमती मनिषा बाळा केवट यांना लाड समितीच्या शिफारसीनुसार वारस हक्काने वसई विरार शहर महानगरपालिका सेवेत "सफाई कामगार" या पदावर सामावुन घेणेस आजची ही सभा मान्यता देत आहे.<br>**अन्अनुमोदक :- (किशोर ग. पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ७. | **श्रीमती निर्मला अश्विन वाघेला यांची वारसाहक्काने सफाई कामगार या पदावर नियुक्ती करणेबाबत.** | ठराव/निर्णय :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती - सी, चंदनसार विरार विभाग येथील कर्मचारी श्रीमती जमना लक्ष्मण कातकरी, सफाई कामगार हे दिनांक दि. २९/०९/२०१८ रोजी महानगरपालिका सेवेतून रुग्णता सेवानिवृत्त झालेले असुन त्यांची मुलगी श्रीमती निर्मला अश्विन वाघेला (वय ३८ वर्षे, ३ महिने) यांना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचेकडील शासन परिपत्रक दिनांक २१ ऑक्टोबर, २०११, शासन परिपत्रक दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ व शासन निर्णय दिनांक ११ मार्च, २०१६ मधील तरतुदीनुसार वारसाहक्क नियुक्तीसाठी पात्र असल्याने श्रीमती निर्मला अश्विन वाघेला यांना लाड समितीच्या शिफारसीनुसार वारस हक्काने वसई विरार शहर महानगरपालिका सेवेत "सफाई कामगार" या पदावर सामावुन घेणेस आजची ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (सखाराम महाडिक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ८. | **श्री विक्रम सुधाकर कांबळे यांना लाड समिती शिफारशीनुसार महानगरपालिका सेवेत सफाई कामगार या पदावर सामावुन घेणेबाबत.** | निर्णय/ठरावः- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती - आय, वसई आस्थापनेवरील कर्मचारी श्रीमती सरोज सुरेश जाधव, सफाई कामगार हे दिनांक ३१/०७/२०१७ रोजी नियत वयोमानानुसार महानगरपालिका सेवेतून सेवानिवृत्त झाले असुन त्यांचा भाचा श्री.विक्रम सुधाकर कांबळे हे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचेकडील शासन परिपत्रक दिनांक २१ ऑक्टोबर, २०११, शासन परिपत्रक दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ व शासन निर्णय दिनांक ११ मार्च, २०१६ मधील तरतुदीनुसार वारसहक्क |

| | | |
|---|---|---|
| | | नियुक्तीसाठी पात्र असल्याने त्यांना लाड समितीच्या शिफारसीनुसार वारस हक्काने महानगरपालिका सेवेत "सफाई कामगार" या पदावर सामावुन घेणेस ही महासभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (प्राची कोलासो) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ९. | **श्री योगेश हरेश गोहील यांना लाड समिती शिफारशीनुसार महानगरपालिका सेवेत सफाई कामगार या पदावर सामावुन घेणेबाबत.** | **निर्णय/ठराव:-** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती - आय, वसई आस्थापनेवरील कर्मचारी श्री. हरेश भाना गोहील, सफाई कामगार हे दिनांक १३/८/२०१८ रोजी नियत वयोमानानुसार महानगरपालिका सेवेतून सेवानिवृत्त झाले असुन त्यांचा मुलगा श्री. योगेश हरेश गोहील हे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचेकडील शासन परिपत्रक दिनांक २१ ऑक्टोबर, २०११, शासन परिपत्रक दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ व शासन निर्णय दिनांक ११ मार्च, २०१६ मधील तरतुदीनुसार वारसहक्क नियुक्तीसाठी पात्र असल्याने त्यांना लाड समितीच्या शिफारसीनुसार वारस हक्काने महानगरपालिका सेवेत "सफाई कामगार" या पदावर सामावुन घेणेस ही महासभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (प्राची कोलासो) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १०. | **वसई विरार शहर महानगरपालिका आस्थापनेवरील बांधकाम व पाणीपुरवठा विभागातील कामकाज करणेसाठी सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची सेवा करार पध्दतीने घेणेबाबत.** | **निर्णय/ठराव:-** श्री. फारुक खान पठाण, उपविभागीय अधिकारी, ग्रामिण पाणी पुरवठा उपविभाग, कल्याण, जिल्हा परिषद, ठाणे हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सेवानिवृत्त अधिकारी असून त्यांना बांधकाम व पाणी पुरवठा योजनेंचा अनुभव असल्याने त्यांना महानगरपालिकेच्या बांधकाम व पाणीपुरवठा विभागातील कामकाज व योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्यासाठी मासिक पारिश्रमीक रक्कम म्हणून निवृत्ती वेतनाची रक्कम+महागाई भत्ता मिळून होणारी रक्कम या वेतनावर शासन निर्णय दि. १७/१२/२०१६ नुसार महानगरपालिकेमध्ये एक वर्षाकरीता करार पध्दतीने नियुक्ती करण्यात येत आहे.<br>१) महानगरपालिकेतील बांधकाम व पाणी पुरवठा विभागातील कामकाज व विविध योजनांची अंमलबजावणी करीता व कामाची निकड पाहता श्री. फारुक पठाण खान यांना करारपध्दतीने दि. १६ डिसेंबर, २०१६ चे शासन निर्णयानुसार प्रथम एक वर्षासाठी मासिक पारिश्रमीक तत्वावर नियुक्ती होणेस व त्याचे मासिक पारिश्रमीकापोटी होणाऱ्या खर्चास आजची ही सभा प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देत आहे.<br>२) महानगरपालिकेने बांधकाम व पाणीपुरवठा विभागामध्ये कामकाज व विविध योजनांची अंमलबजावणीसाठी शासकीय सेवानिवृत्त अधिकारी पारिश्रमीक तत्वावर होण्यासाठी देण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरून प्राप्त होणाऱ्या अर्जावर कार्यवाही करणेस व नेमणूक देण्याचे अधिकारी मा. आयुक्त महोदयांना देणेस आजची ही सभा मंजूरी देत आहे व या पोटी होणाऱ्या खर्चास ही सभा प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देत आहे.<br>३) महानगरपालिकेतील विविध संवर्गातील अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत, अशा रिक्त पदांवर देखील महानगरपालिकेस आवश्यकता |

असल्यास दि. १६ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयानुसार शासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची कंत्राटी पध्दतीने मासिक पारिश्रमीक तत्वावर नेमणूक करणेस आजची ही सभा प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देत आहे. त्यानुसार जाहिरात प्रसिध्द करून इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या नेमणूका कराव्यात, असे निर्देश आजची ही महासभा प्रशासनास देत आहे.

**अनुमोदक :- (चंद्रकांत गोरीवले) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

---

**११.** **<u>सन २०१९-२० हया वित्तीय वर्षासाठी महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ चे कलम ३ नुसार वृक्ष प्राधिकरण समितीचे सदस्यांच्या नियुक्त्या करणेबाबत.</u>**

<u>ठराव/निर्णय</u> :- सन २०१९-२० या वित्तीय वर्षासाठी वृक्ष प्राधिकरण समितीवर बहुजन विकास आघाडीतर्फे खालील सदस्याच्या नावांची शिफारस प्राप्त झाली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मार्शल डॉमणिक लोपिस | ८. | सचिन हरेश्वर घरत |
| २. | प्रफुल्ल गोविंद पाटील | ९. | प्रकाश नथुराम चौधरी |
| ३. | मनिष आत्माराम वर्तक | १० | रणजीत वामन पाटील |
| ४. | दिलीप यशवंत गोवारी | ११. | पंकज नारायण चोरघे |
| ५. | प्रतिमा सचिन पाटील | १२. | चंद्रकांत सिताराम जाधव |
| ६. | शोभा नितीन मोरे | १३. | कल्पना रोहीदास म्हात्रे |
| ७. | मिलींद जगन्नाथ घरत | | |

शिवसेना या पक्षातर्फे वृक्ष प्राधिकरण समितीवर खालील सदस्यांची नियुक्ती साठी शिफारस प्राप्त झाली आहे.

१. श्री. स्वप्निल अविनाश बांदेकर

उपरोक्त शिफारशी मान्य करण्यात येत असून वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण समितीवर सन २०१९-२० या वित्तीय वर्षासाठी खालील महानगरपालिका सदस्याची सदर समितीचे सदस्य म्हणून नियुक्त करण्यात येत असल्याचे आजची सर्वसाधारण सभा ठरवित आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मार्शल डॉमणिक लोपिस | ८. | सचिन हरेश्वर घरत |
| २. | प्रफुल्ल गोविंद पाटील | ९. | प्रकाश नथुराम चौधरी |
| ३. | मनिष आत्माराम वर्तक | १० | रणजीत वामन पाटील |
| ४. | दिलीप यशवंत गोवारी | ११. | पंकज नारायण चोरघे |
| ५. | प्रतिमा सचिन पाटील | १२. | चंद्रकांत सिताराम जाधव |
| ६. | शोभा नितीन मोरे | १३. | कल्पना रोहीदास म्हात्रे |

| | |
|---|---|
| ७. मिलींद जगन्नाथ घरत | १४. स्वप्निल अविनाश बांदेकर |

**मा.महापौर :-** सर्व सन्मा. सदस्यांचे अभिनंदन. प्रस्ताव सर्वानुमते मंजूर.

**अनुमोदक :- ( अब्दुल हक पटेल) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

---

**१२.** **सन २०१९-२० हया वित्तीय वर्षासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० व कलम ३१ -अ अन्वये महिला व बालकल्याण समितीवर सदस्यांच्या नेमणूका करणे.**

**ठराव/निर्णय :-** सन २०१९-२० हया वित्तीय वर्षासाठी माहिला व बाल कल्याण समितीवर बहुजन विकास आघाडीतर्फे खालील सदस्यांच्या गावाची शिफारस प्राप्त झाली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | भारती प्रदीप देशमुख | ८. | निलीमा नरेश गायकवाड |
| २. | ज्योती मच्छिंद्र धोंडेकर | ९. | जयश्री जयवंत किणी |
| ३. | ममता दुर्गेश सुमन | १० | आशा बाळकृष्ण धुलसाडा |
| ४. | मनिषा मनोहर जाधव | ११. | प्रज्ञा विनेश देसाई |
| ५. | कांता अनंत पाटील | १२. | सुषमा उमेश दिवेकर |
| ६. | माया सुबोध चौधरी | १३. | अजीव यशवंत पाटील |
| ७. | हेमांगी विनोद पाटील | १४. | नितीन दिनानाथ राऊत |

शिवसेना या पक्षातर्फे महिला व बाल कल्याण समितीवर खालील सदस्याची नेमणूक होणेकामी शिफारस प्राप्त झाली आहे.

१. श्रीमती किरण उदय चेंदवणकर

उपरोक्त शिफारशी मान्य करण्यात येत असून वसई विरार शहर महानगरपालिकेच्या महिला व बाल कल्याण समितीवर सन २०१९-२० या वित्तीय वर्षासाठी खालील महापालिका सदस्यांची सदर समितीचे सदस्य म्हणून नियुक्त्या करण्यात येत असल्याचे आजची सर्वसाधारण सभा ठरवित आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | भारती प्रदीप देशमुख | ९. | जयश्री जयवंत किणी |
| २. | ज्योती मच्छिंद्र धोंडेकर | १० | आशा बाळकृष्ण धुलसाडा |
| ३. | ममता दुर्गेश सुमन | ११. | प्रज्ञा विनेश देसाई |
| ४. | मनिषा मनोहर जाधव | १२. | सुषमा उमेश दिवेकर |
| ५. | कांता अनंत पाटील | १३. | अजीव यशवंत पाटील |
| ६. | माया सुबोध चौधरी | १४. | नितीन दिनानाथ राऊत |

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | हेमांगी विनोद पाटील | १५. | श्रीमती किरण उदय चेंदवणकर |
| ८. | निलीमा नरेश गायकवाड | | |

**अनुमोदक :-** (अब्दुल हक पटेल) **सुचक :-** (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**१३.** **सन २०१९-२० हया वित्तीय वर्षासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३० अन्वये स्थापित केलेल्या वैदयकिय सहाय्य व आरोग्य समितीवर कलम ३१ अ (२) नुसार प्रमाणशिर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाद्वारे सदस्यांच्या नेमणूका करणे.**

**ठराव/निर्णय :-** सन २०१९-२० या वित्तीय वर्षासाठी वैदयकिय सहाय्य व आरोग्य समितीवर बहुजन विकास आघाडीतर्फे खालील सदस्यांच्या नावाची शिफारस प्राप्त झाली आहे.

| अ.क्र | नाव | अ.क्र | नाव |
|---|---|---|---|
| १. | डॉ. प्रविण हिराजी क्षिरसागर | ६. | भुपेंद्र आत्माराम पाटील |
| २. | संतोष दत्ताराम वळवईकर | ७. | सचिन संभाजी देसाई |
| ३. | राजेंद्र राजाराम कांबळी | ८. | निलिमा आनंद कांबळे |
| ४. | पंकज भास्कर ठाकूर | ९. | महेश हरी पाटील |
| ५. | रमेश जयराम घोरकना | | |

उपरोक्त शिफारशी मान्य करण्यात येत असून वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैदयकीय सहाय्य व आरोग्य समितीवर सन २०१९-२० या वित्तीय वर्षासाठी खालील महापालिका सदस्यांची सदर समितीचे सदस्य म्हणून नियुक्त्या करण्यात येत असल्याचे आजची सर्वसाधारण सभा ठरवित आहे.

| अ.क्र | नाव | अ.क्र | नाव |
|---|---|---|---|
| १. | डॉ. प्रविण हिराजी क्षिरसागर | ६. | भुपेंद्र आत्माराम पाटील |
| २. | संतोष दत्ताराम वळवईकर | ७. | सचिन संभाजी देसाई |
| ३. | राजेंद्र राजाराम कांबळी | ८. | निलिमा आनंद कांबळे |
| ४. | पंकज भास्कर ठाकूर | ९. | महेश हरी पाटील |
| ५. | रमेश जयराम घोरकना | | |

**अनुमोदक :-** (अब्दुल हक पटेल) **सुचक :-** (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**१४.** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियाचे

**प्रस्ताव / निर्णय :-** सदर प्रस्तावाचे सभेमध्ये वाचन करुन चर्चा केली असता सन २०१९-२० साठी प्रशासनाने प्रस्तावित केलेले दर व कराचे दरास मंजूर करणेत येत असून ज्या मालमत्ता धारकाने ५ वर्षाचे कराचे बील एकत्रित भरणा केलेले असेल अशा मालमत्ता

| | | |
|---|---|---|
| | **कलम ९९ नुसार सन २०१९-२० या वित्तीय वर्षासाठी मालमत्ता कर व दर निश्चित करणे.** | धारकांना वाढीव मालमत्ता करात सुट देण्यास आजची सभा प्रशासनाला आदेशित करीत आहे.<br>**अनुमोदक :- (अब्दुल हक पटेल) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १५ | **वसई विरार शहर महानगरपालिकेच्या मा.सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक ०७ दिनांक १९/१२/२०१८ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५१ (१) मधील तरतुदीनुसार निलंबित केला असुन सदर अधिनियमाच्या कलम ४५१ (२) अन्वये सदर निलंबना प्रकरणी महासभेने आपले अभिवेदन सादर करणेबाबत.** | निर्णय :- उपरोक्त शासन निर्णय व महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४५१ (२) नुसार वसई-विरार शहर महानगरपालिकेची हि सभा या ठरावाद्वारे अभिवेदन सादर करीत आहे की, वसई विरार शहर महानगरपालिकेचा सर्वसाधारण सभा ठराव क्र.०७, दिनांक १९/१२/२०१८ हा व्यापक लोकहिताच्या विरुध्द असल्याचे शासनाचे म्हणणे महापालिकेस मान्य नाही, कारण —<br>महानगरपालिकेचे लोकनियुक्त प्रतिनिधी हे जनतेचे व्यापक हित जाणीत असल्याने त्यांनी आपल्या ठरावात उपस्थित केलेले सर्वच मुद्दे हे येथील स्थानिक नागरीकांच्या / भूमीपुत्रांच्या जिवीताशी व वित्ताशी निगडीत आहेत. त्यामुळे सदरचा ठराव हा व्यापक लोकहिताच्या विरुध्द आहे हे शासनाचे म्हणणे महापालिकेस मान्य नाही.<br>हायस्पीड रेल्वेच्या प्रकल्प बांधकामामुळे वसई-विरार उपप्रदेश क्षेत्रात मोठ्या प्रमाणात आर्थिक उन्नती होण्याची संभावना आहे. सदर प्रकल्पाकरीता जमीन मालकाने जमीन उपलब्ध करुन दिल्यास जमिन मालकांना टी.डी.आर. मिळाल्यास प्रकल्पाच्या खर्चात बचत होणार आहे व यामुळे जमीन मालकांनाही त्यांच्या जमिनीचा उचित मोबदला मिळणार आहे हे शासनाचे म्हणणे मान्य करता येत नाही, कारण सदर प्रकल्पाखालील जमिनीचे निश्चित मालक / भोगवटादार कोण हे ठरविणे अवघड आहे. तेथे निवासी चाळींचे मोठ्या प्रमाणावर बांधकाम झाले असून यापूर्वीच मालकांनी अनाधिकृत बांधकामे करुन खोल्यांची विक्री केलेली आहे. परंतु ७/१२ सदरी मूळ मालकांची नावे असल्याने टी.डी.आर. चा लाभ त्या मालकांनाच मिळणार आहे. त्यामुळे मोबदला देण्यावरुन स्थानिक नागरीकांमध्ये मोठ्या प्रमाणात असंतोष / वाद निर्माण होणार आहेत व त्याची झळ महानगरपालिकेस बसणार आहे.<br>यापूर्वी येथील जमिनी फ्रेट कॅरीडॉरसाठी शासनाने संपादीत करण्यासाठी नोटीसा बजावल्या आहेत त्यामुळे देखील स्थानिक शेतकरी भूमीहीन होणार आहे.<br>वसई विरार उप-प्रदेशासाठी मेट्रो रेल्वे प्रोजेक्टची आवश्यकता असून सुध्दा शासन त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे.<br>एम.आर.टी.पी. कायद्यानुसार वसई विरार शहर महानगरपालिका ही नियोजन प्राधिकरण असून शासनाने त्यांचा ठराव विखंडीत केल्यास नियोजन प्राधिकरणाच्या हक्कास बाधा येईल तसेच ७४ व्या घटना दुरुस्तीनुसार स्थानिक स्वराज्य संस्थाना असणाऱ्या मुलभूत अधिकारांचा शासन अवमान करीत आहे असे या महानगरपालिकेचे मत आहे.<br>वर नमुद सर्व बाबींचा साधक बाधक विचार करुन शासनाने सदरचा ठराव विखंडीत करु नये ही विनंती. या उपरही शासनाने सदर ठराव विखंडीत केल्यास वसई विरार शहर महानगरपालिका, उक्त कामी मे. न्यायालयात दाद मागण्याचा आपला अधिकार राखून ठेवीत आहे याची कृपया नोंद घ्यावी. |

| | | |
|---|---|---|
| | | सदरचा प्रस्ताव मा. महापौर महोदय यांनी, अधिनियमाचे कलम ४५१(२) अन्वये अभिवेदन म्हणून शासनास सादर करावा अशी ही सभा ठरवित आहे.<br>अनुमोदक :- (उमेश नाईक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १६. | वसई विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग सुर्या टप्पा १ व २ योजनेअंतर्गत मासवण येथील उद्चंन केंद्रामधील अशुध्द पाण्याचे ३०० HP क्षमतेचे २ पंप बदलुन नविन पंप बसविणे व कार्यान्वीत करणे कामी येणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | **निर्णय / ठराव :-** वरिलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामी रक्कम रु. ९६.७८ लक्ष खर्चास आर्थिक व प्रशासकिय मंजूरी देण्यास व पुढील ई - निविदा कार्यवाही करण्यास हि सभा मंजुरी देत आहे.<br>अनुमोदक :- (यज्ञेश्वर पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १७. | महापरिवर्तन अभियाना अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिकेच्या हद्दीत **Rouble Nagi Art Foundation** मार्फत **Slum Painting** व **Art Work** करण्यासाठी **Memorandum of Understanding (MOU)** सामंज्यंस करार करणेबाबत. | **प्रस्तावाचा ठराव/निर्णय :-** सदर बाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेत आली. झालेल्या सामंज्यंस करारानुसार सदरचे काम निशुल्क करण्यात येणार आहे सबब सदर प्रस्ताव आजच्या सभेत अवगत करण्यात आला असुन त्यास मा.सर्वसाधारण सभा मान्यता देत आहे<br>अनुमोदक :- (नरेंद्र पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १८. | सन २०१८-१९ ते सन २०२०-२१ या तीन वर्षांच्या कालावधीकरीता दिवाणमान अंबाडी रोड येथील जलतरण तलावाचे देखभाल व्यवस्थापन करणेकामी नवीन एजन्सी नेमणूक करणेस प्रशासकीय व | **ठराव/निर्णय :-** सादर केलेल्या प्रस्तावानुसार जलतरण व्यवस्थापन करणेकामी होणाऱ्या रक्कम रु.८१ लक्ष अपेक्षित खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- (वृंदेश पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| | वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | |
| १९. | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (बी) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (पू) वॉर्ड क्र. ४७ मध्ये ओम नगर नाला येथील साई मंदीर ते ९० फुट रस्त्यापर्यंत असलेल्या नाल्यावर आर.सी.सी. स्लॅब बांधणे कामास प्रशासकिय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत. | ठराव/निर्णय :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होवून उपरोक्त नमुद कामाच्या रक्कम रु. १,०४,२०,५४७/- रकमेच्या अंदाजपत्रकास ही सभा मंजूरी देत आहे व तसेच पुढील आवश्यक निविदा कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.<br>अनुमोदक :- (निलेश देशमुख) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| २०. | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील नालासोपारा रेल्वे स्टेशनच्या दक्षिणेच्या बाजूस FOB बांधणेकामी परवानगी मिळणेबाबत. मुंबई रेल्वे विभाग विकास कार्पोरेशन हयांचा दिनांक १५/१०/२०१८ चा अर्ज. | ठराव :- वरील विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेत आली वरील प्रमाणे नालसोपारा स्टेशन उत्तरेस रेल्वेस FOB च्या बांधकामासाठी लॅडींग करीता ७५ चौ.मी. इतकी जागा उपलब्ध करुन देणेस ही सभा मंजूरी देत आहे. जागेची मालकी येणाऱ्या बांधकामासह महापालिकेची राहील हया अटीसह परवानगी देणेस ही सभा ठरवित आहे.<br>अनुमोदक :- (किशोर ग. पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| २१ | महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती जी मधील जुचंद्र येथे गिरीजा म्हात्रे सार्वजनिक शौचालय ते जुचंद्र ऑफीस पर्यंत आर.सी.सी. नाला बांधणे कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | ठराव /निर्णय :- वरील प्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा करणेत आली. सदर कामाच्या रक्कम रु १,४६,६१,२०६/- च्या अंदाजपत्रकास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे हया कामी निविदा दर मागविण्यात यावेत असे ही सभा ठरवित आहे.<br>अनुमोदक :- (कन्हैय्या भोईर) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |

| | | |
|---|---|---|
| २२. | प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (प) येथील प्रभाग क्र.६० मध्ये सिव्हीक सेंटर (एस.टी.डेपो रोड) ते मुख्य नाल्यापर्यंत पाईप गटार बांधणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. | **ठराव/निर्णय :-** वरील प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होवुन उपरोक्त नमुद कामाचे रक्कम रु.१,२६,६८,०७२/- च्या रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे व तसेच पुढील आवश्यक निविदा कार्यवाही करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :-** (किशोर ग.पाटील) **सुचक :-** (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| २३ | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती जी मधील वॉर्ड नं. ८८ मध्ये फादरवाडी येथे फादरवाडी नाका ते विद्याविकसीनी शाळे पर्यतचा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | **ठराव/निर्णय :-** वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होवुन नमुद कामी होणाऱ्या रक्कम रु. १,०९,७६,८४०/- खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यांत येत आहे तसेच पुढील निविदा कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :-** (कन्हैय्या भोईर) **सुचक :-** (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| २४ | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती जी मधील वॉर्ड नं. ८८ मध्ये फादरवाडी नाका ते विद्याविकसीनी शाळे पर्यत गटार बांधणे व पेव्हर ब्लॉक बसविणे कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | **ठराव /निर्णय :-** वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होवुन नमुद कामी होणाऱ्या रक्कम रु. १,९५,७१,३९८/- खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यांत येत आहे तसेच पुढील निविदा कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :-** (कन्हैय्या भोईर) **सुचक :-** (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| २५ | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती जी मधील वॉर्ड नं. ८८ मध्ये फादरवाडी, चिंचपाडा येथे विनायक कृपा सोसा. ते हनुमान मंदिर ते शांतीपाडा ते प्रिती मेटल ते अपोलो इंड., गिता उद्योग इंड. येथे रस्ता खडीकरण व डांबरीकरण | **ठराव/निर्णय :-** वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होवुन नमुद कामी होणाऱ्या रक्कम रु. ७७,६०,२३१/- खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यांत येत आहे तसेच पुढील निविदा कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :-** (कन्हैय्या भोईर) **सुचक :-** (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| | करणेचे कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | |
| २६ | नालासोपारा पाणीपुरवठा विभागाच्या अखत्यारीत येणाऱ्या पेल्हार योजनेच्या जलशुध्दीकरण केंद्रातील जुन्या योजनेचे जलशुध्दीकरण केंद्र तोडून नव्याने ७.५ एम.एल.डी. क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र उभारणेकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे. | ठराव/निर्णय:- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सवीस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामाच्या रु.२,८१,२७,०००/- रक्कमेच्या अंदाजपत्रकास व तसेच जलशुध्दीकरण केंद्र कार्यान्वीत करणे कामी इतर अनुषंगीक कामे ( पंपिंग व्यवस्था, पॅनल बोर्ड, केबलींग व जोडणी इत्यादी ) येथील कामाकरीता पुढील आवश्यक निविदा कार्यवाही करून येणाऱ्या खर्चास आर्थिक, प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.<br>अनुमोदक :- ( निलेश देशमुख) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| २७ | ६९ गावांच्या पाणी पुरवठा योजने अंतर्गत येणाऱ्या गावांच्या वाढीव विकसीत भागाकरीता लागणारे आवश्यक पाईप खरेदी करणेकामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. | निर्णय/ ठराव :- उपरोक्त विषयाबाबत सविस्तर चर्चा करून असे ठरविण्यांत आले की, ६९ गावांपैकी महानगरपालिकेत समाविष्ट गावांच्या वाढीव विकसीत भागांमध्ये पाणी पुरवठा करण्याची जबाबदारी महानगरपालिकेची असल्याने प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास व अंदाजपत्रकीय खर्चास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत असून सदर कामी आवश्यक पाईप महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या रेट कॉन्ट्रक्ट नुसार किंवा अन्य शासकिय रेट कॉन्ट्रॅक्ट नुसार खरेदी कामी त्वरित कार्यवाही करण्यास हि सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे.<br>अनुमोदक :- (नरेंद्र पाटील ) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| २८ | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील मौजे-विरार येथील स.नं.-११९,हि.नं.३अ,३क या जागेवरील "पार्किंग लॉट" चे आरक्षण (आरक्षण क्र.१२०) या जागेवर श्री.दिलीप जैन यांना रहिवास व वाणिज्य वापराची इमारत व त्यासोबत पार्किंग लॉटची इमारत समावेशक आरक्षणाच्या (Accomodation Reservation) संदर्भातील शासन | ठराव/निर्णय :- वरील नमूद नुसार वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील मौजे-विरार येथील स.नं-११९, हि.नं.३अ, ३क या जागेवरील "पार्किंग लॉट" चे आरक्षण (आरक्षण क्र. १२०) या जागेवर श्री.दिलीप जैन यांना रहिवास व वाणिज्य वापराची इमारत व त्यासोबत पार्किंग लॉटची इमारत समावेशक आरक्षणाच्या (Accomodation Reservation) संदर्भातील शासन निर्णय क्र. टिपीएस-१८१३/३०६७/प्र.क्र.४९२/१३/मनपा/नवि-१३ दि.०२/०५/२०१६ अन्वये आरक्षण विकसित करण्यास शासन निर्णय क्र. टिपीएस-१८१३/३०६७/प्र.क्र.४९२/१३/मनपा/नवि-१३ दि.०२/०५/२०१६ अन्वये मंजूर करणेंत आलेल्या समावेशक आरक्षण (Accomodation Reservation) धोरणानुसार अंमलबजावणी करणेकामी असलेल्या तरतुदी नुसार कलम क्रमांक ५.३ मधील पर्याय-३ (Option-३)अन्वये पार्किंग लॉट हे आरक्षण विकसित करण्यांसाठी खालील नमूद तरतुदी नुसार पुढील कार्यवाही करणेसाठी नमूद शर्ती व अटींवर मान्यता देत आहे. |

निर्णय क्र. टिपीएस-१८१३/३०६७/प्र.क्र.४९२/१३/मनपा/नवि-१३ दि.०२/०५/२०१६ अन्वये आरक्षण विकसित करण्यास नाहरकत/परवानगी मिळणेबाबत.

| Reserevation | Person /Authority who may acquire /develop | Principle for Developemtnt through Accomodation Reservation subject to which development is permissible |
|---|---|---|
| **5.3) Parking** | Planning Authority/Appropriate Authority/Owner | **Option-3**<br>The Owner may be allowed to develop parking space according to the designs, specifications and conditions prescribed by the Municipal Commissioner subject to handing over of constructed parking area equal to double the reservation area, to Planning Authority free of cost subject to condition that,<br><br>i) The operation and the maintenance of the facility will be decided by Municipal Commissioner.<br>ii) Parking spaces may be in basement or on stilts or on first/second floor with separate entry & exit.<br>After handing over the above said parking area to the Planning Authority, the owner shall be entitled to construct with full permissible FSI of the entire Plot and permissible TDR potential of the entire Plot for other permissible user in that zone .<br><br>iii) The Municipal Commissioner, if required, shall allow the TDR for the unutilised FSI if any (after deducting in-situ FSI as mentioned in sr no (ii) above) which shall be utilised as per the TDR utilisation regulations. |

२) महानगरपालिकेला हस्तांतरीत करावयाच्या पार्किंग लॉट विकास व बांधकाम हे वर नमूद तरतुदींनुसार करावयाचे असल्याने याबाबतचे डिझाईन-ड्राईंग (नकाशे), स्ट्रक्चरल डिझाईन तसेच बांधकामाचे तपशिल (Specification) व तद्अनुषंगिक तांत्रिक बाबी महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाने तपासून घेऊन निश्चित कराव्यात व त्यास तांत्रिक मान्यता दयावी.

३) याबाबतचे डिझाईन-ड्राईंग (नकाशे),स्ट्रक्चरल डिझाईन तसेच पार्किंग लॉट विकास व बांधकामाचे तपशिल (Specification) व तद्अनुषंगिक तांत्रिक बाबी महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाने निश्चित केल्यानुसार सदरचे बांधकाम झाले असल्याबाबतची खातरजमा बांधकाम विभागाने करुन घेऊन सदरचे पार्किंग लॉट विकास व बांधकाम संबंधित जागेसह बांधकाम विभागाने महानगरपालिकेच्या ताब्यात/हस्तांतरीत करुन घ्यावे व पुढील कार्यवाही करावी.

४) महानगरपालिकेला हस्तांतरीत करावयाच्या पार्किंग लॉटच्या आरक्षणाच्या दुप्पट क्षेत्राएवढे बांधकाम पूर्ण करुन सदर जागा पार्किंग लॉट चे बांधकामासह महानगरपालिकेला हस्तांतरीत केल्यानंतर विकासक यांनी त्यांना दिलेल्या बांधकाम परवानगी नुसार

<table>
<tr><td></td><td></td><td>पुढील काम सुरु करण्यात यावे.<br>वरील अटी-शर्तीनुसार समावेशक आरक्षणाच्या (Accomodation Reservation) शासन निर्णया तील तरतुदीनुसार अर्जदार यांचे प्रस्तावानुसार आरक्षण क्र.१२० "पार्किंग लॉट" आरक्षण विकसित करण्यासाठी तसेच याकामी येणा-या खर्चास ही महासभा आर्थिक व प्रशासकिय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- (यज्ञेश्वर पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर.</td></tr>
<tr><td>२९</td><td><u>वसई विरार शहर महानगरपालिक हद्दीतील मौजे-मोरे येथील स.नं-७८/ब/१२,७८/ब/१३ या जागेवरील "हेल्थ सेंटर" चे आरक्षण (आरक्षण क्र.३१५) या जागेवर समावेशक आरक्षणाच्या (Accomodation Reservation) संदर्भातील शासन निर्णय क्र.टिपीएस-१८१३/३०६७/प्र.क्र.४९२/१३/मनपा/नवि-१३ दि.०२/०५/२०१६ अन्वये आरक्षण विकसित करण्यास नाहरकत/परवानगी मिळणेबाबत.</u></td><td><u>ठराव/निर्णय :-</u> १) वरील नमूद हेल्थ सेंटर आरक्षण क्र.३१५ हे आरक्षण विकसित करण्यासाठी शासन निर्णय क्र. टिपीएस-१८१३/३०६७/प्र.क्र.४९२/१३/मनपा/नवि-१३ दि.०२/०५/२०१६ अन्वये मंजूर करणेंत आलेल्या समावेशक आरक्षण (Accomodation Reservation) धोरणानुसार अंमलबजावणी करणेकामी असलेल्या एकूण तरतुदी मधील खालील नमुद तरतुदीमधील कलम -४ मधील पर्याय क्रमांक -२ (Option-२) प्रमाणे व त्यात नमूद शर्ती व अटीं नुसार कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.<br><table>
<tr><th>Reserevation</th><th>Person /Authority who may acquire /develop</th><th>Principle for Developemtnt through AccomodationReservation subject to which development is permissible</th></tr>
<tr><td>4) Health Facility</td><td>Planning Authority/</td><td><u>Option -2</u></td></tr>
</table></td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| a)Health Center | Appropriate Authority/Owner | i) The Commissioner may allow the owner to develop the reservation, subject to handing over to the Planning Authority 40 % independent plot along with 50% constructed amenity of total area free of cost in lieu of construction amenity TDR as per general Regulation no (iii) mention below & as per norms prescribed by Municipal Commissioner.<br>ii) The owner shall be entitled to develop remaining 60 % land for the uses permissible in adjoining zone with full permissible FSI of the entire Plot and permissible TDR potentia of the entire Plot.<br>iii) The Municipal Commissioner, if required, shall allow the TDR for the unutilised FSI only (after deducting in-situ FSI as mentioned in sr no (ii) above ) which shall be utilised as Per the TDR utilisation regulations.<br>iv) Reservation shall be allowed to be developed in parts. |

२) महानगरपालिकेला हस्तांतरीत करावयाच्या हेल्थ सेंटर इमारतीचे बांधकाम हे वर नमूद तरतुदींनुसार करावयाचे असल्याने याबाबतचे डिझाईन-ड्राईंग (नकाशे), स्ट्रक्चरल डिझाईन तसेच बांधकामाचे तपशिल (Specification) व तद्अनुषंगिक तांत्रिक बाबी महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाने तपासून घेऊन निश्चित कराव्यात व त्यास तांत्रिक मान्यता दयावी.

३) याबाबतचे डिझाईन-ड्राईंग (नकाशे),स्ट्रक्चरल डिझाईन तसेच बांधकामाचे तपशिल (Specification) व तद्अनुषंगिक तांत्रिक बाबी महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाने निश्चित केल्यानुसार सदरचे बांधकाम झाले असल्याबाबतची खातरजमा बांधकाम विभागाने करुन घेऊन सदरचे बांधकाम संबंधित जागेसह बांधकाम विभागाने ताब्यात/हस्तांतरीत करुन घ्यावे.

४) महानगरपालिकेला हस्तांतरीत करावयाच्या हेल्थ सेंटरच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण करुन भोगवटा दाखला घेतल्यानंतर सदर जागा इमारतीसह महानगरपालिकेला हस्तांतरीत केल्यानंतर सदर जागेचा महानगरपालिकेलच्या नावाचा स्वतंत्र ७/१२ उतारा व भूमी अभिलेख कार्यालयाकडील नकाशा सादर केल्यानंतरच शासनाच्या क्र.टिपीएस-१८१३/३०६७/प्र.क्र.१२२/१२/मनपा-कोकण/नवि-१३ दि.२९/०१/२०१६ च्या शासन निर्णयातील कलम ४.२ नुसार Construction Amenity TDR देण्यांत यावा.

वरील अटी-शर्तीनुसार समावेशक आरक्षणाच्या (Accomodation Reservation) शासन निर्णया तील तरतुदीनुसार अर्जदार यांचे प्रस्तावानुसार आरक्षण क्र.३१५ "हेल्थ सेंटर" आरक्षण विकसित करण्यासाठी तसेच याकामी येणा-या खर्चास ही

| | | |
|---|---|---|
| | | महासभा आर्थिक व प्रशासकिय मान्यता देत आहे<br>**अनुमोदक :- (किशोर ना.पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ३० | **श्री. वाय. एस. रेड्डी यांनी मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिका क्र.- १००६१/२०१७ मध्ये दिलेल्या अंतरीम आदेशाच्या अनुषंगाने कारवाई करणेबाबत.** | **ठराव/निर्णय :-** श्री. वाय.एस.रेड्डी हे वसई विरार शहर महानगरपालिकेत उपसंचालक, (नगर रचना) या रिक्त पदावर दि. १६/०८/२०१० पासुन प्रतीनियुक्तीवर कार्यरत होते. प्रतीनियुक्तीवर कार्यरत असतांना श्री. रेड्डी यांना ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे यांनी दि. २८/०४/२०१६ रोजी लाच देताना रंगेहात पकडले. त्यांना मा. आयुक्त सो यांनी त्याचे मुळ कार्यालय सिडको येथे दि. ७/०५/२०१६ चे आदेशान्वये परत पाठवुन त्यांचा प्रतीनियुक्ती कालावधी संपुष्टात आणला. मा. आयुक्त यांचे आदेशाविरुध्द श्री. रेड्डी यांनी मे. उच्च न्यायालय, मुंबई येथे दावा क्र. १००६१ of २०१७ दाखल केला. सदर दाव्याच्या अनुषंगाने मे. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि. १५/०१/२०१९ रोजी अंतरीम आदेश दिलेला आहे. सदर आदेशात श्री. रेड्डी हे सिडकोचे अधिकारी नसुन ते वसई विरार शहर महानगरपालिकेचे अधिकारी आहेत. त्यानुसार त्यांना महानगरपालिका सेवेत पुनःस्थापीत करुन आवश्यकता असल्यास त्यांचेवर महानगरपालिका शिस्तभंगविषयक कारवाई करु शकते. असा निर्णय दिलेला आहे.मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेला अंतरीम आदेश मान्य करून आजची ही सभा श्री. रेड्डी यांना महानगरपालिका सेवेत अकार्यकारी पदावर रुजू करून घेणेस व त्याचेवर आवश्यकती शिस्तभंग विषयक कारवाई करणेस मान्यता देत आहे.<br>**प्रस्तावाच्या बाजूने :- ९५**<br>**प्रस्तावाच्या विरोधात :- ०४**<br>**अनुमोदक :- (किशोर ना.पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव बहुमताने मंजूर.** |
| ३१ | **वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील स.नं.६९,हि.नं१ ते ६, स.नं.७१, हि.नं १ ते १०, स.नं.७२, हि.नं १ ते १५, स.नं. ७३, हि.नं ४ ते १४, स.नं. ७४, हि.नं.१ ते १०, १२, १३, १५, १६, १७A, १८ व २०, स.नं. ७४ A,हि.नं १७A,स.नं.७५, हि.नं १ ते ४, ५A,५B, ७ व ८, स.नं. ७६, हि.नं.१६A व १६B, स.नं. ७७, हि.नं १A, १B, २ ते ५ व १२ व स.नं. ७८, हि.नं १०/१,** | **ठराव/निर्णय :-** १) वरील नमूद नुसार वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील स.नं. ६९, हि.नं १ ते ६, स.नं. ७१, हि.नं १ ते १०, स.नं. ७२, हि.नं १ ते १५, स.नं. ७३, हि.नं ४ ते १४, स.नं. ७४, हि.नं १ ते १०, १२, १३, १५, १६, १७A, १८ व २०, स.नं. ७४A, हि.नं १७A, स.नं. ७५, हि.नं १ ते ४, ५A, ५B, ७ व ८, स.नं. ७६, हि.नं १६A व १६B, स.नं. ७७, हि.नं १A, १B, २ ते ५ व १२ व स.नं. ७८, हि.नं १०/१, १०/२, १०/३ व १२ ते १५ मौजे-माणिकपूर व स.नं. १२१, हि.नं १, २, ५, ६A, ६B, ७ व ८A, स.नं. १२४, हि.नं ४ ते ७ व ११ ते १३, स.नं. १२५, हि.नं १ ते ३, ४A, ४B, ४C, ५, ६, ७A व ७B, स.नं. १२६, हि.नं २B, ३A, ३B, ४, ५, ६, ७/१, ७/२ व ८, स.नं. १२७, हि.नं १ ते ५, स.नं. १२८, हि.नं १/१, १/२, ४, ५, ६, ७, ८A व ८B व स.नं. १२९, हि.नं १, २, ३, ५B व ६ मौजे-दिवाणमान या जागेवरील "गार्डन" चे आरक्षण (आरक्षण क्र. ६२३) या जागेवर अर्जदार यांना रहिवास व वाणिज्य वापराची इमारत व शासन निर्णय क्र. टिपीएस-१८१३/३०६७/प्र.क्र.४९२/१३/मनपा/नवि-१३ दि.०२/०५/२०१६ अन्वये मंजूर करणेंत आलेल्या समावेशक आरक्षण (Accomodation Reservation) धोरणानुसार अंमलबजावणी करणेकामी असलेल्या कलम क्रमांक १ मधील पर्याय-२ (Option-२) मध्ये खालील नमूद तरतुदी नुसार मान्यता देण्यांत येत आहे. |

१०/२, १०/३ व १२ ते १५ मौजे-माणिकपूर व स.नं. १२१, हि.नं.१, २, ५, ६A, ६B, ७ व ८A, स.नं. १२४, हि.नं. ४ ते ७ व ११ ते १३, स.नं.१२५, हि.नं १ ते ३, ४A, ४B, ४C, ५, ६, ७A व ७B, स.नं.१२६, हि.नं २B, ३A, ३B, ४, ५, ६, ७/१, ७/२ व ८, स.नं.१२७, हि.नं. १ ते ५, स.नं. १२८, हि.नं१/१, १/२, ४, ५, ६, ७, ८A व ८B व स.नं. १२९, हि.नं १, २, ३, ५B व ६ मौजे-दिवाणमान या जागेवरील "गार्डन" चे आरक्षण (आरक्षण क्र.६२३) या जागेवर अर्जदार यांना रहिवास व वाणिज्य वापराची इमारत व त्यासोबत गार्डनचे समावेशक आरक्षण धोरणाच्या (Accomodation Reservation) संदर्भातील शासन निर्णय क्र. टिपीएस-१८१३/३०६७/प्र.क्र.४९२/१३/मनपा/नवि-१३ दि.०२/०५/२०१६ अन्वये आरक्षण विकसित करण्यास नाहरकत/परवानगी मिळणेबाबत.

| Reservation | Person /Authority who may acquire /develop | Principle for Development through Accomodation Reservation subject to which development is permissible |
|---|---|---|
| **1)Recreational** -<br>1.1) Open reservations like Garden, Play Ground, Children PG,Open Space, Recreation Ground Park, Park etc | Planning Authority/ Appropriate Authority/ Owner | **Option-2**<br>The Commissioner may allow the owner to develop the reservation on **70 %** of the land and after handing over it to the planning authority free of cost then remaining **30 %** land may be allowed to be developed as per adjoining use subject to following terms /conditions:-<br>The owner shall be entitled to develop remaining 30 % land for the uses permissible in adjoining zone with full permissible FSI of the entire Plot and permissible TDR potential of the entire Plot.<br>The Municipal Commissioner, if required, shall allow the TDR for the unutilised FSI if any (after deducting in-situ FSI as mentioned in Sr. no (i) above) which shall be utilised as per the TDR utilisation regulations.<br>) No reservation shall allow to be developed partly. |

२) महानगरपालिकेला हस्तांतरीत करावयाच्या गार्डनचे विकास व आवश्यक ती बांधकामे हे वर नमूद तरतुदींनुसार करावयाचे असल्याने याबाबतचे डिझाईन-ड्राईंग (नकाशे), स्ट्रक्चरल डिझाईन तसेच बांधकामाचे तपशिल (Specification) व तद्अनुषंगिक तांत्रिक बाबी महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाने तपासून घेऊन निश्चित कराव्यात व त्यास तांत्रिक मान्यता दयावी.

३) याबाबतचे डिझाईन-ड्राईंग (नकाशे),स्ट्रक्चरल डिझाईन तसेच गार्डनचे व त्याबाबतचे बांधकामाचे तपशिल (Specification) व तद्अनुषंगिक तांत्रिक बाबी महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाने निश्चित केल्यानुसार सदरचे बांधकाम झाले असल्याबाबतची खातरजमा बांधकाम विभागाने करुन घेऊन सदरचे गार्डनचे विकास व बांधकाम संबंधित जागेसह बांधकाम विभागाने ताब्यात/हस्तांतरीत करुन घ्यावे.

४) महानगरपालिकेला हस्तांतरीत करावयाच्या गार्डनचा विकास व बांधकाम पूर्ण करुन व आवश्यक असल्यास भोगवटा दाखला घेतल्यानंतर सदर जागा इमारतीसह महानगरपालिकेला हस्तांतरीत केल्यानंतर सदर जागेचा महानगरपालिकेलच्या नावाचा स्वतंत्र ७/१२ उतारा व भूमी अभिलेख कार्यालयाकडील नकाशा सादर केल्यानंतर शासनाच्या समावेशक आरक्षण धोरणानुसार उर्वरित ३० % जागेवर विकास अनुज्ञेय राहील.

वरील अटी-शर्तीनुसार समावेशक आरक्षणाच्या (Accomodation Reservation) शासन निर्णयातील तरतुदीनुसार अर्जदार यांचे प्रस्तावानुसार आरक्षण क्र.३२६ "गार्डन" आरक्षण विकसित करण्यासाठी तसेच याकामी येणा-या खर्चास ही महासभा

| | | |
|---|---|---|
| | | आर्थिक व प्रशासकिय मान्यता देत आहे<br>अनुमोदक :- ( कल्पेश मानकर) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ३२ | महानगरपालिका हद्दीतील सर्वभाषिक शाळेत (इंग्रजी माध्यम वगळून) शिकणाऱ्या विदयार्थ्यां करिता महानगरपालिका परिवहन सेवेचा वार्षिक मोफत पास योजने करिता महिला व बालकल्याण विभागामार्फत ५०% वित्तीय सहाय्य परिवहन सेवेस अदा करणे व या करिता येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत. | **निर्णय :-** महिला व बालकल्याणच्या शिफारशी नुसार महानगरपालिका हद्दीतील जि.प.शाळेतील व सर्व भाषिक शाळेत (इंग्रजी माध्यम वगळुन) शिकत असणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांची घरे शाळेपासून २ ते ३ कि.मी अंतरापेक्षा जास्त आहेत.अशा विद्यार्थांना या योजनेचा लाभ देण्यात यावा.शाळेच्या मागणी नुसार पात्र लाभार्थ्यांना महिला व बालकल्याण विभागा मार्फत महानगरपालिका हद्दीतील सर्व भाषेत शाळेत (इंग्रजी माध्यम वगळुन) शिकणाऱ्या इयत्ता १ ली ते इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांना महानगरपालिकेच्या परिवहन सेवेचा ५० % दराने माहे १ जुन ते ३० एप्रिल या ११महिन्यांच्या कालावधी करीता येणाऱ्या अंदाजे ३,५०,००,०००/- (तीन कोटी,पंन्नास लाख रुपये) अपेक्षित खर्चास ही सभा सर्वानुमते प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- (माया चौधरी) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ३३ | प्रभाग समिती एच मधील दिवानमान तरणतलाव ईमारत दुसऱ्या मजल्यावर तयार करणेत आलेली शुटींग रेंज व्यवस्थापनबाबत धोरण तसेच खेळाडुंसाठी प्रवेश शुल्क निश्चित करणे व ॲडवान्स कोचींग पुरविणे. | **निर्णय/ठराव :-** वरील प्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होवून उपरोक्त नमुद कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे या कामी आर्म लायसन्स शस्त्रासाठी आवश्यक ती पुर्व परवानगी घेण्यात यावी तसेच याकामी पुढील निविदा कार्यवाहीसाठी होणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.<br>अनुमोदक :- (वृंदेश पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ३४ | विरार (पूर्व) रेल्वे फाटक क्र. ४० येथील प्रस्तावित रॅम्प ब्रिजखालील दुकानदारांना स्थलांतरित करणेबाबत. | **निर्णय :-** वरीलप्रमाणे बाधित दुकानदारांना टप्प्याटप्प्याने स्थलातरीत करणे व वेळोवेळी ब्रिजच्या बांधकामाखालील तेवढयाच क्षेत्रफळाची जागा उपलब्ध करुन देणेस ही सभा मान्यता देत असून आजची सर्वसाधारण सभा याबाबत वेळोवेळी निर्णय घेण्याचे सर्व अधिकार मा. आयुक्ताना प्रदान करीत आहे.<br>अनुमोदक :- (यज्ञेश्वर पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| ३५ | व्यवसायाकरीता नाहरकत दाखला व साठा परवाना देणेबाबत चर्चा करुन निर्णय घेणे. | ठराव/निर्णय :- मा. सर्वसाधारण सभेत सदर प्रस्तावाबाबत सभागृहांत साधक बाधक चर्चा करणेत येऊन वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीत व्यवसायाकरिता ना हरकत दाखला व साठा परवाना देणेबाबत सविस्तर चर्चा करून निर्णय घेणेकामी सदरचा विषय स्थायी समितीकडे सादर करण्यास ही सभा मंजूरी देत आहे. प्रशासनाने याबाबत नियमानुसार पुढील कार्यवाही करणेस ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (वृंदेश पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ३६ | फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड (F.D.C.M.) मार्फत अवनत वनक्षेत्रावर २०१९ च्या पावसाळ्यात वनीकरण करणेच्या प्रस्तावास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | ठराव/निर्णय:- सदर प्रस्तावाबाबत सभेत सविस्तर चर्चा करणेत आली. महाराष्ट्र शासनाचे सन २०१९-२० च्या पावसाळ्यात राज्यात ३३ कोटी वृक्षलागवड करणेचे उद्दिष्ट असून सदर उद्दिष्टाअंतर्गत वसई-विरार शहर महानगरपानिकेस १,९५,००० वृक्ष लागवडीचे उद्दिष्टे असल्याने फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड (F.D.C.M.) यांनी त्रिपक्षीय करारांतर्गत वनीकरण करणेबाबत सादर केलेल्या कोशिंबे येथील ११० हेक्टर व धानिव येथील ५० हेक्टर असे एकूण १६० हेक्टरवर १७७७६० इतकी वृक्षलागवड करणे व ३ वर्ष संगोपन करणेकामी येणाऱ्या अंदाजपत्रकीय खर्च रक्कम रु.१५,००,००,०००/- (अक्षरी - पंधरा कोटी रुपये मात्र/-) इतक्या खर्चास व फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड (F.D.C.M.) यांना ५० % रक्कम आगाऊ प्रदान करणेस ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करीत आहे.महाराष्ट्र शासनाने दिलेल्या १९५००० वृक्षलागवडीच्या उद्दिष्टांपैकी उर्वरीत १७२४० वृक्षलागवड करीता वनविभाग, ठाणे यांचेकडून संतोषभुवन, पेल्हार किंवा इतर ठिकाणी जागेची उपलब्धता करून घ्यावी व होणाऱ्या जागेच्या उपलब्धतेनुसार फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड (F.D.C.M.) कडून उर्वरीत १७२४० वृक्षलागवडीचे उद्दिष्ट पूर्ण करावे व त्याकरीता होणाऱ्या खर्चास व फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड (F.D.C.M.) यांना ५० % रक्कम आगाऊ प्रदान करणेस ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करीत आहे.<br>अनुमोदक :- (यज्ञेश्वर पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

**नगरसचिव**

**वसई विरार शहर महानगरपालिका**